1202

**सभा क्रमांक : ४८**

जा.क्र./जिपसा/विवि/सभा/ /१५
वित्त विभाग, जिल्हा परिषद, सांगली.
दिनांक : 19/06/2015

याव्दारे अर्थ समिती सदस्य मा.श्री/श्रीमती.______________________ मु.पो. तालुका__________ जिल्हा सांगली यांना कळविणेत येते की, अर्थ समितीची मासिक सभा **दिनांक २६.०६.२०१५ रोजी दुपारी ०१.०० वाजता मा.उपाध्यक्ष जिल्हा परिषद,सांगली** येथे खालील नमुद केलेले कामकाज चालविणेसाठी बोलाविणेत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

सौ.शुभांगी पाटोळे
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा**
**सचिव अर्थ समिती जिल्हा परिषद सांगली.**

मा.श्री.लिंबाजी महीपती पाटील
**सभापती अर्थ समिती**
**जिल्हा परिषद सांगली.**

**विषय क्र.१ :-** **दि.०२.०६.२०१५** रोजी घेणेत आलेल्या वित्त समिती सभेचा अहवाल वाचून कायम करणे.

**विषय क्र.२ :-** शासना कडील महत्वाचे शासननिर्णय व पत्राचे वाचन करणे.

**विषय क्र.३ :-** माहे मे २०१५ चा सर्व खात्यांचा योजना निहाय प्राप्त अनुदान व खर्चाचा आढावा घेणे.

**विषय क्र.४ :-** माहे मे २०१५ अखेर जि.प.तसलमात वसुलीबाबत आढावा घेणे.

**विषय क्र.५ :** माहे मे २०१५ अखेर जि.प.मुद्रणालयातील वसुलीबाबत आढावा घेणे.

**विषय क्र.६ :-** सांगली जिल्हा परिषद उत्पन्न वाढीसाठी वित्त समिती क्र. ३९ दि.१४.०८.२०१२ अन्वये स्थापन केलेल्या अभ्यास गटास एक वर्षाची मुदतवाढ मिळणेस शिफारस करणेबाबत

**विषय क्र.७ :-** माहे मार्च २०१५ अखेर मासिक लेख्यास अर्थ समितीची शिफारस घेवून स्थायी समितीच्या अंतिम मान्यतेसाठी सादर करणेबाबत

**मा.सभापती यांचे परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयावरती चर्चा करणे.**

सौ.शुभांगी पाटोळे
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा**
**सचिव अर्थ समिती जिल्हा परिषद सांगली.**

मा.श्री.लिंबाजी महीपती पाटील
**सभापती अर्थ समिती**
**जिल्हा परिषद सांगली.**

प्रत माहितीसाठी,
१) मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद, सांगली
२) मा.सभापती,______________________ विषय समिती, जिल्हा परिषद, सांगली.
३) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली.
४)मा.सभापती पंचायत समिती,मिरज/तासगांव/विटा/आटपाडी/कवठेमहांकाळ/जत/वाळवा/शिराळा/पलूस/कडेगांव.
५)खातेप्रमुख जिल्हा परिषद, सांगली,
सामान्य/ग्रा.पं/वित्त/छोपावि/बांधकाम/शिक्षण(प्राथ/माध्य/निरंतर)/आरोग्य/एन.आर.एच.एम./सर्व शिक्षण अभियान /सकवि/मबाक/पशुसंवर्धन/ग्रापापु/कृषि /मुद्रणालय/डिआरडिए./ **स्टेनो** /कार्यकारी अभियंता (स्थानिकस्तर ) वारणाली ऑफीस वि.बाग,सांगली.
६) गट विकास अधिकारी पंचायत समिती,
मिरज/तासगांव/विटा/आटपाडी/कवठेमहांकाळ/जत/वाळवा/शिराळा/पलूस/कडेगांव.

## दिनांक ०२.०६.२०१५ रोजी झालेल्या ४७ व्या अर्थ समिती मासीक सभेचा कार्यवृत्तांत

### भाग- पहिला

**उपस्थित सदस्य :**

१. मा.श्री.लिंबाजी महिपती पाटील, उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ समिती.
२. मा.श्री.सुरेश गणपतराव मोहिते पाटील, सदस्य.
३. मा.श्री.भाऊसाहेब शामराव पाटील, सदस्य.
४. मा.श्री.तानाजी हरी यमगर, सदस्य.
५. मा.श्री.दत्ताजीराव निळकंठराव पाटील, सदस्य
६. मा.सौ.सुशिला हिंदूराव नांगरे, सदस्या .
७. मा.सौ.कल्पना वसंतराव सावंत, सदस्या.
८. मा.सौ.रुपाली विक्रमसिंह पाटील सदस्या.
९. मा.श्री.दिलीप दत्तू बुरसे, सदस्य

**उपस्थित अधिकारी :**

१) वरिष्ठ लेखाधिकारी जि प सांगली
२) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा),जि.प.सांगली. प्रतिनिधी
३) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.),जि.प.सांगली.
४) कार्यकारी अभियंता,(इ.व द) जि.प.सांगली.
५) कार्यकारी अभियंता, (ग्रा.पा.पु.) जि.प.सांगली.प्रतिनिधी
६) कृषि विकास अधिकारी, जि.प.सांगली.
७) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, प्रतिनिधी जि.प.सांगली,.
८) कार्यकारी अभियंता (छोपावि) जि.प. सांगली. प्रतिनिधी
९) जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.सांगली. प्रतिनिधी
१०) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला बाल कल्याण) जि.प.सांगली
११) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जि.प.सांगली
१२) शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प.सांगली.
१३) शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.सांगली.
१४)शिक्षणाधिकारी (निरंतर) जि.प.सांगली.
१५)एन. आर. एच. एम. प्रतिनिधी.
१६)प्रतिनिधी सर्व शिक्षा अभियान.

# अर्थ समिती सभा दिनांक ०२/०६/२०१५ रोजी झालेल्या ४७ व्या अर्थ समिती मासिक सभेचा कार्यवृत्तांत

आजच्या अर्थ समिती सभेस उपस्थित असलेले मा.उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ समिती व सदस्य, खातेप्रमुख व कर्मचारी यांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी स्वागत करुन मा.उपाध्यक्ष तथा सभापती यांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरुवात करणेत आली.

सर्वप्रथम जि.प.चे माजी सदस्य व आटपाडी गावचे सुपुत्र व जवळचे सहकारी रामभाऊ पाटील यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०१/०६/२०१५ रोजी दु:खद निधन झालेने मा.उपाध्यक्ष यांनी दु:खवटयाचा ठराव (ठराव क्रमांक १) मांडला. याबद्दल ही सभा शोक व्यक्त करीत असून त्यांचे कुटुंबीयांचे दु:खात सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती व सद्गती देवो अशी प्रार्थना करुन दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रद्धांजली वाहणेत आली.श्री.संजय माळी हे दि.२९/०५/२०१५ रोजी जि.प.येथे कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग या पदी हजर झालेने त्यांचे मा.उपाध्यक्ष यांचे वतीने पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करणेत आले.

**विषय क्रमांक १:-** मागील सभा दिनांक ०८ /०५/२०१५ रोजी घेण्यात आलेल्या वित्त समिती सभेचा अहवाल वाचून कायम करणेत आला.

**विषय क्रमांक २ व ३:-** शासनाकडील महत्त्वाचे शासन निर्णय व पत्रांचे वाचन करणेबाबत व माहे मे २०१५ अखेर सर्व खात्यांचा योजनानिहाय व खातेनिहाय अनुदान व खर्चाचा आढावा घेणेबाबत विषय सादर केला असता खातेनिहाय माहिती खालीलप्रमाणे देणेत आली.

**महिला व बालकल्याण विभाग :-** मा.आयुक्त यांचेकडून प्राप्त एसएमएसनुसार बालविकास प्रकल्प कार्यालय जागेसाठीचा प्रस्ताव तयार करणेबाबत गटविकास अधिकारी व सीडीपीओ यांना विभागाकडून कळविणेत आले आहे. मा.जि.प.सदस्यांनीही प्रस्ताव सूचवावेत तसेच अंगणवाडी बांधकामाबाबतही प्रस्ताव सूचवावेत. जेणेकरुन पुढील कार्यवाही करणे सोयीचे होईल. डी.पी.डी.सी.मधून अंगणवाडी बांधकामकरिता चालू वर्षी विभागास एकूण २ कोटी १९ लाख रुपये प्राप्त आहेत. १२९ अंगणवाडयांचे लक्ष आहे. सदर बांधकामाबाबत सविस्तर आढावा दिला. मा.सदस्यांनीही अंगणवाडी बांधकामाबाबत प्रस्ताव/मागणी दयावी.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य :** सौर अभ्यासिका मंजुर केलेप्रमाणे त्याचा लाभ जि.प.शाळांना प्रामुख्याने शाळांतील संगणक सुरु राहतील यादृष्टीने देण्यात यावा. विभागाकडील रिक्त पदे भरणेबाबत नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही सत्त्वर करावी.

**समाजकल्याण विभाग :-** खात्याने वसंत घरकुल योजनेबाबत आढावा दिला.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य :** वसंत घरकुल योजनेंतर्गत प्राप्त निधी व प्रत्यक्षातील विनियोग योग्य रितीने झालेबाबत आढावा घेणेत यावा. यापुढील बैठकीत अपंग घरकुल बांधकामाबाबत केले कार्यवाहीचा अहवाल दयावा. अपंग स्वयंरोजगार बाबत लाभार्थ्यांना नवीन फॉर्म देण्यात यावेत.

**कृषि विभाग :-** या पंधरवडयामध्ये शासननिर्णय नाहीत. दि.२७/०५/२०१५ रोजी मुंबई येथे खरीप हंगामाबाबत आढावा बैठक आयोजित करणेत आली होती. त्यामध्ये ट्रॅक्टरखरेदीबाबत शेतकऱ्यांना आवडणारा ट्रॅक्टर खाजगीरित्या खरेदी करुन त्याचा अनुदानाचा प्रस्ताव शासनास पाठविता येईल अशी अट शिथिल करणारा बदल करणेत आला.चापकटर, प्लॅस्टीकच्या ताडपत्र्या, बॅटरीवर चालणारे स्प्रे पंप, इलेक्ट्रॉनिक्स मोटर्स प्राप्त होणेबाबत कार्यवाही सुरु आहे. मान्यता प्राप्त आहे. तसेच डीपीडीसीतून ११ प्राथमिक आरोग्य केंद्रांना निधी मंजुर आहे. त्याबाबत जि.प.सभेमध्ये मध्ये मंजुरी मिळालेनंतर ई-निविदा मागविणेत येतील. अपारंपारिक उर्जेमध्ये सौर अभ्यासिका, सौर पथदिवे खरेदीबाबत कार्यवाही सुरु आहे.

**विषय क्रमांक ४ :- माहे एप्रिल २०१५ अखेर जि.प.तसलमात वसुलीबाबत आढावा घेणे.**

बांधकाम विभागाची रु.८४,६४,६३०/- इतकी तसलमात प्रलंबित आहे तसेच आरोग्य विभागाची १,८३,४३०/- रु.इतकी तसलमात प्रलंबित आहे त्याबाबत पाठपुरावा करावा. कृषि विभागाने तसेच उर्वरित संबंधित तसलमात थकबाकी असलेल्या खात्यांनी याबाबत पाठपुरावा करुन आवश्यक ती कार्यवाही सत्वर करावी.

**विषय क्रमांक ५ :- माहे एप्रिल २०१५ अखेर जि.प.मुद्रणालयातील वसुलीबाबत आढावा घेणे.**

आरोग्य विभागाची थकबाकी रु.१५,५५,२६०/- इतकी आहे. मुद्रणालयाकडील प्रत्यक्ष थकबाकीबाबत आढावा घेऊन भरणेबाबत कार्यवाही करावी. तसेच उर्वरीत खात्यांनीही याबाबत थकबाकी लवकरात लवकर भरणेच्या दृष्टीने कार्यवाही करावी.

मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य : शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी २००१ नुसार जि.प.स्तरावरील योजना राबविताना पाळावयाचे वेळापत्रक, त्या अनुषंगाने विविध स्तरावर सोपविलेली जबाबदारी, योजनेबाबत तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी, लाभार्थी निवड, पुरवठा आदेश, माहे जानेवारीचे आत साहित्य वाटप करणे या बाबींचे काटेकोरपणे पालन व्हावे. तसेच लाभार्थींना पुरविण्यात येणारे साहित्याच्या दर्जा, कंपनीचे तसेच विभागाचे नांव इत्यादि बाबत पुरवठा आदेशावर स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे, मालाची पडताळणी झ ालेशिवाय वाटप करणेत येऊ नये असा ठराव (ठराव क्र.३) सभेत संमत करणेत आला. त्याप्रमाणे अंमलबजावणी करणेबाबत सर्व खातेप्रमुखांना सूचना देण्यात आल्या.

**विषय क्र ६ :-** माहे एप्रिल २०१५ अखेर जिल्हा परिषदेमधील शासन स्तरावरील इतर विभागातील येणे बाकीचा आढावा घेणे.

**शिक्षण विभागः-** योजना निहाय जमा खर्चाचा आढावा घेण्यात आला.

**मा.श्री.भाऊसाहेब पाटील, सदस्य :** शिक्षण विभागातील चौकशी बाबत श्री.लोंढे यांचे प्रकरणी कोणती कार्यवाही करणेत आली?

**शिक्षण विभाग (प्रतिनिधी) :-** सदर प्रकरणी माध्यमिक विभागाकडून चौकशी सुरु असून चौकशी कामकाज पूर्ण होताच अवगत करणेत येईल.

शिक्षक वर्गणीबाबत मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठपुरावा सुरु असल्याचे खात्याने सांगितले.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य :** विभागाकडे बाबी प्रलंबित असून त्यातील ३१ मे रोजी सेवानिवृत्त होणारी पेंन्शन प्रकरणे निर्गत करणे, वेतन देयके, वैदयकीय बीले प्रकरणे निकाली काढणे, सर्व विभागांची रिक्त पदे भरतीबाबत कार्यवाही ठेवणे, स्वीय निधी, नगरपालिका शिक्षक भरती, बदली प्रकरणे, शाळाभाडे वसुली, शिक्षक वर्गणी बाबत आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करणेत यावी.

**विषय क्रमांक** ७ :- वित्त विभागाकडील लेखा विषयक नोंदवहया पूर्ण असल्याने त्यास मान्यता सर्वानुमते मान्यता देण्यात आली.यानंतर मा.जि.प.सदस्य श्री.भाऊसाहेब पाटील यांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडलेबद्दल सर्वांचे पुनःश्च एकदा आभार मानून सभा संपलेचे जाहिर केले.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य :** नाविण्यपूर्ण योजनेतून सौर पंपावर पाच एचपी चे मीटर बसविणेबाबत प्रस्ताव तयार करुन जिल्हा नियोजन बैठकीमध्ये निधी मंजुरीबाबत पाठपुरावा करणेत यावा.गोडाऊन बांधकामाबाबत आवश्यक ती कार्यवाही ठेवावी.

**बांधकाम विभाग** :- नवीन शासन निर्णय या महिन्यात नाही. जि.प.स्वीय निधीचा आढावा सादर केला.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य :** जि.प.आवारातील भाडयाने दिलेल्या इमारती/कार्यालये यासाठी वीज कनेक्शन देण्यात आले आहे अशा ठिकाणी स्वतंत्र मीटर बसविणेत यावे.हस्तांतर अभिकरण योजनेतील गट अ,ब,क,ड,इ तसेच जिल्हा नियोजन अंतर्गत प्राप्त नियतव्यय, मंजुर कामे आणि सध्या किती कामे नव्याने घेता येतील याची माहिती दयावी. जि.प.सदस्यांना निधी ३ लाख रुपये देयमधून सदस्यांना एलसीडी प्रोजेक्टर घेता येईल किंवा कसे याबाबत अर्थ विभागाने विचार करावा.जि.प.तील बंद लिफ्ट बाबत ४ दिवसांत तांत्रिक मान्यता घेऊन कार्यवाही करणेत येत असल्याचे खात्याने सांगितले.

**मा.उपाध्यक्ष :** दोन होडींचे टेंडर बाबत सबंधित विभागाने कार्यवाही ठेवावी.

**पाणीपुरवठा विभाग :-** खात्याकडील आढावा दिला.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य :** नवीन किती योजना मंजुर आहेत?

**ग्रामीण पाणी पुरवठा** :- २२७ वाडयावस्त्यांचा आराखडा तयार केला आहे. त्यातील बहुतांशी एस्टीमेटस पूर्ण आहेत.याबाबत कार्यवाही करणेत येत आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य :** सन २०१३-१४ चे खात्याचे स्थानिक लेखा निधीचे ऑडीट पूर्ण झाले आहे काय?

ग्रामीण पाणी पुरवठा :- अदयापि झालेले नाही.

मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य : स्थानिक लेखा निधीकडील शकपुर्तता होऊन ऑडीट रिपोर्ट तीन महिन्यांचे आत व्हावे. तसेच त्याची प्रत जि.प.सदस्यांनाही देण्यात यावी. यासाठी स्थानिक लेखा निधी पथकाला अवगत करणेत यावे. असा ठराव संमत करणेत यावा. (ठराव क्रमांक २) सन २०१३-१४ च्या स्था.ले.परीक्षणाबाबत अर्थ विभागाने सर्व खात्याकडून आढावा घ्यावा.

**आरोग्य विभाग :-** विभागाकडील वाहनचालकाचे वेतन अदा करणेबाबत शासनाकडून प्राप्त निधी उपलब्धतेनुसार वेतन देणेची कार्यवाही करणेत येत आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य :** जिल्हा नियोजनकडील नियतव्यय, नवीन बांधकामे देखभाल दुरुस्ती, कोणत्या प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी प्राप्त अनुदान, त्यावरील कार्यवाही, किती प्राथ.आरोग्य केंद्रांना मंजुरी दिली व देण्यात येणार आहे याची माहिती दयावी.

**आरोग्य विभाग :-** जोपर्यंत शासनाकडून निधी वाढवून मिळत नाही तोवर नवीन प्राथ.आरोग्य केंद्र बांधकामे घेण्यात येणार नाहीत. रिक्त पदे भरणेबाबत आरक्षण पाहून नियमानुसार कार्यवाही करणेत येत आहे.

मातामृत्यू झालेल्या दोन अपत्ये असणाऱ्यांना १५ हजार रुपये लाभ देण्याच्या योजनेबाबत मूळ बजेटला लेखाशिर्ष उघडले गेले नसल्याने यावर्षी या योजनेचा विचार करता येणार नाही असे मा.उपाध्यक्ष यांनी सांगितले.

गरोदर मातांना गरोदरपणात मृत्यू झाल्यास पंतप्रधान जीवनज्योती विमा योजना अंतर्गत प्रत्येक लाभार्थीनी ३३०/- रु.विमा भरणेबाबत २ लाखाची विमा पॉलिसी उतरविणेबाबत भविष्यात संबंधित लाभार्थ्याकडून हप्ते भरणेबाबत येणाऱ्या संभाव्य अडचणींबाबत चर्चा करणेत आली.

## भाग दुसरा

**दिनांक ०२.०६.२०१५ रोजी झालेल्या ४७ व्या अर्थ समिती मासिक सभेचा कार्यवृत्तांत**

**विषय क्रमांक १:-** मागील सभा दिनांक ०८/०५/२०१५ रोजी घेण्यात आलेल्या वित्त समिती सभेचा अहवाल वाचून कायम करणेत आला.

**ठराव क्र ३११-** दिनांक ०८/०५/२०१५ रोजी घेण्यात आलेल्या वित्त समिती सभेचा अहवाल वाचून कायम करणेत आला.ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : मा.श्री. भाऊसाहेब शामराव पाटील, सदस्य.
अनुमोदक : मा.सौ. कल्पना वसंतराव सावंत, सदस्या.

**विषय क्रमांक २:-** शासनाकडील महत्त्वाचे शासन निर्णय व पत्रांचे वाचन करणे.

**ठराव क्र ३१२-** शासनाकडील महत्वाचे शासन निर्णय व पत्रांचे वाचन करणेत आले.ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : मा.श्री. दत्ताजीराव निळकंठराव पाटील, सदस्य.
अनुमोदक : मा.तानाजी हरी यमगर, सदस्य.

**विषय क्र ३** - माहे एप्रिल २०१५ चा सर्व खात्याचा योजनानिहाय खातेनिहाय प्राप्त अनुदान व खर्चाचा आढावा घेणे.

**ठराव क्र ३१३-** माहे एप्रिल २०१५ चा सर्व खात्याचा योजनानिहाय खातेनिहाय अनुदान व खर्चाचा आढावा घेणेत आला.ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : मा.श्री. सुरेश गणपतराव मोहीते,सदस्य.
अनुमोदक : मा.सौ. रुपाली विक्रमसिंह पाटील, सदस्या.

**यानंतर मा सभापती यांच्या परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयावरती ठराव करणेत आले.**

**विषय क्रमांक ४ :-** माहे एप्रिल २०१५ अखेर जि.प.तसलमात वसुलीबाबत आढावा घेणे.

**ठराव क्र ३१४-** माहे एप्रिल २०१५ अखेर जि.प.तसलमात वसुलीबाबत चर्चा होवून काटेकोरपणे वसुली करणे येणेबाबतचा ठराव संमत करणेत आला.

सुचक : मा.सौ. रुपाली विक्रमसिंह पाटील, सदस्या.
अनुमोदक :मा.श्री दिलीप दत्तू बुरसे

**विषय क्रमांक ५ :-** माहे एप्रिल २०१५ अखेर जि प मुद्रणालयातील वसुलीबाबत आढावा घेणे.

**ठराव क्र ३१५ -** माहे एप्रिल २०१५ अखेर जि प मुद्रणालयातील वसुलीबाबत चर्चा होवून काटेकोरपणे वसुली करणेबाबतचा ठराव संमत करणेत आला.

सुचक : मा.सौ. कल्पना वसंतराव सावंत, सदस्या.
अनुमोदक :मा. श्री. सुरेश गणपतराव मोहीते

**विषय क्रमांक ६ :-** माहे एप्रिल २०१५ अखेर जिल्हा परिषदेमधील शासन स्तरावरील व इतर विभागातील येणेबाकीचा आढावा घेणे.

**ठराव क्र ३१६ -** माहे एप्रिल २०१५ अखेर जिल्हा परिषदेमधील शासन स्तरावरील व इतर विभागातील येणेबाकीचा आढावा घेणेत आला.ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : मा.भाऊसाहेब शामराव पाटील, सदस्या.
अनुमोदक :मा.सौ. कल्पना वसंतराव सावंत, सदस्या

**विषय क्रमांक ७ :-** वित्त विभागाकडील लेखा विषयक नोंदवहया माहे जानेवारी २०१५ ते मार्च २०१५ पुर्ण असलेने त्यास मान्यता देणेबाबत चर्चा करणे.

**ठराव क्र ३१७ -** वित्त विभागाकडील लेखा विषयक नोंदवहया माहे जानेवारी २०१५ ते मार्च २०१५ पुर्ण असलेने त्यास मान्यता ठराव सर्वानुमते मंजूर.

यानंतर मा.जि.प.सदस्य श्री.भाऊसाहेब पाटील यांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडलेबद्दल सर्वांचे पुन:श्च एकदा आभार मानून सभा संपलेचे जाहिर केले.

**श्रीमती शुभांगी पाटोळे**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा**
**सचिव अर्थ समिती जिल्हा परिषद सांगली**

**मा श्री लिंबाजी महीपती पाटील**
**सभापती अर्थ समिती**
**जिल्हा परिषद सांगली**